दिनांक ३१/१०/२०१७ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, आरोग्य भवन, मुंबई येथे आयोजीत केलेल्या राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त

........................................................................................................................

कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संदर्भात दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी मा. डॉ. संजिव कुमार, आयुक्त (आरोग्य सेवा) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली आरोग्य भवन, राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, मुंबई येथे राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीची बैठक दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) डॉ सतिश पवार, संचालक आरोग्य सेवा, मुंबई
२) डॉ (श्रीमती) अर्चना पाटील, अतिरिक्त संचालक (कुटुंब कल्याण) पुणे
३) डॉ. (श्रीमती) रेखा डावर, माजी स्त्रीरोग तज्ञ, जे.जे. रुग्णालय, मुंबई
४) डॉ. (श्रीमती) विनया आंबोरे, सहाय्यक प्राध्यापक (शस्त्रक्रिया विभाग), जे.जे. रुग्णालय, मुंबई
५) डॉ. एन.डी. देशमुख, सहाय्यक संचालक (कुटुंब कल्याण) पुणे

सदर बैठकीचे विषय पत्रिके वरील विषय खालील प्रमाणे आहेत.

(१) दि. २.२.२०१७ रोजी झालेल्या गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.
(२) कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजने अंतर्गत सन २०१६-१७ मधील भौतिक व आर्थिक बाबींचा आढावा घेणे.
(३) सन २०१६-१७ मधील उर्वरित व माहे सप्टेंबर १७ अखेर पर्यंत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिये नंतर झालेल्या मृत्यू प्रकरणांचा आढावा घेणे.
(४) मा. अध्यक्षांच्या संमतीने ऐन वेळी उपस्थित होणा-या विषयांवर चर्चा करणे.

अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा (कु.क.) पुणे यांनी मा. अध्यक्षांचे व सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. या सभेतील विषय सूचीनुसार विषयांची माहिती दिली. उपस्थित सदस्यांनी प्रत्येक विषयांस अनुसरुन आपली तांत्रिक व प्रशासकीय बाबीच्या संदर्भात मते मांडली. त्यानुसार काही महत्वाचे धोरणात्मक निर्णय या समितीने घेतले. प्रत्येक विषयानुसार झालेली चर्चा, उपस्थित केलेले मुद्दे व झालेले निर्णय या विषयांचा कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे -

- दि. २.२.२०१७ रोजीच्या बैठकीचे ईतिवृत्त वाचून कायम करण्यांत आले. त्यामधील काही मुदयांवर सखोलपणे चर्चा करण्यांत आली, याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे -

- श्रीमती. शारदा काळे, यवतमाळ, श्रीमती. किर्ती लोखंडे, अमरावती व श्रीमती. मुस्कान समुदे, गोंदिया या महिलांचा मृत्यू कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करतेवेळी लहान किंवा मोठया आतडयाला जखम झाल्यामुळे त्यातून निर्माण होणा-या गुंतागुंतीमुळे झाल्याचे निष्पन्न होत आहेत. यासाठी भविष्यामध्ये उत्कृष्ट शस्त्रक्रियेनंतरच्या पाठपुरावा करण्यासाठी तज्ञांच्या अभिप्रायाप्रमाणे मार्गदर्शक सूचना तयार करुन राज्यातील सर्व कुंटुंब नियोजन शस्त्रक्रिया शल्यचिकित्सकांना निर्गमित करव्यात याविषयी एकमत झाले.

- सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये ८० टक्के नुकसान भरपाई लाभार्थ्यांना अदा करण्यात आली आहे. तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये प्रलंबित लाभार्थ्यांना तातडीने लाभ देण्याविषयी पाठपुरावा करण्यात यावा.

- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांन्वये सर्व जिल्हयातील ५ टक्के स्टॅटिक मोड मधील सत्रांचे २ टक्के फिक्स डे सेशन सत्रांचे व १ टक्का मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयातील सत्रांचे नियमित इन्स्पेक्शन करुन आढळलेल्या त्रुटींचे जिल्हास्तरावरुन निराकरण करावे.



Scanned by CamScanner

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामधील उर्वरित व माहे सप्टेंबर १७ अखेर पर्यंत कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर झालेल्या ८ मृत्यूंचे अन्वेषण व चर्चा या सभेमध्ये करण्यांत आली. तज्ञांनी सर्व मृत्यू प्रकरणांचे पृथ:करण केले. यामध्ये शस्त्रक्रियापूर्वीची तपासणीमधील त्रुटी, शस्त्रक्रिया करतेवेळी झालेले दुर्लक्ष, पाठपुरावा करतेवेळी न घेतलेली काळजी इ. त्रुटींचे विश्लेषण केले. मृत्यू प्रकरणांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of Deceased | Date of Operation & Date of Death | Type of Operation | Remark of State Quality Assurance Sub Committee |
|---|---|---|---|---|
| 1 | Smt. Sharda Kale | 19-01-17<br>21-01-17 | Minilap | • Perforation was missed by surgeon.<br>• Surgeon should be trained.<br>• Unless newly trained surgeons have full confidence should not be allowed to perform surgery independently.<br>• Pt. should have been transferred early.<br>• Complications after FP Surgery should be attended by seniors doctors from Surgery & OBGY Dept. |
| 2 | Smt. Kirti Lokhande | 12-08-16<br>18-08-16 | MTP with TL | • Hospital should strictly follow guidelines for preoperative, consent, check list , intra operative, post operative monitoring |
| 3 | Smt. Ashwini Devre | 18-05-16<br>20-05-16 | Minilap | • Hospital should strictly follow guidelines for preoperative, consent, check list , intra operative, post operative monitoring |
| 4 | Smt. Chaya Sargar | Operation not done<br>21-12-16 | Admitted for Minilap Operation | • Careful preoperative examination by Medical Officer<br>• Availability of emergency druges<br>• Prompt Treatment |
| 5 | Smt. Muskan Samudre | 12-05-17<br>15-05-17 | Minilap | • Check list should mandatorily used before TL/NSV<br>• previous history should be taken before TL/NSV<br>• In doubtful situation USG should be done to r/o pathology |
| 6 | Smt Yaijantimala Waghmare | 23-03-17<br>27-05-17 | Minilap | • Case papers should be sent along with patient regarding operation done & treatment given<br>• Infection prevention practices should have been strictly followed at PHC, Parbhani<br>• Case should not have been discharged and should have been referred early to higher centers |
| 7 | Sonli Mane | 08-03-17<br>11-03-17 | LSCS with TL | • Senior gynecologist should attend critical cases. |
| 8 | Radhabai Dhavle | 07-06-17<br>26-06-17 | Minilap | • Post Operative follow up as per protocol<br>• Prompt referral to higher institute |



Scanned by CamScanner

अतिरिक्त संचालक (कु.क.) पुणे यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानले व बैठक समाप्त झाली.

सदर बैठकीमध्ये झालेले महत्वाचे निर्णय, त्याबाबत करावयाची कार्यवाही, अपेक्षित कार्यकाल व जबाबदार अधिकारी यांचा संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे:

| अ. क्र. | विषय | करावयाची कार्यवाही व अपेक्षित कालावधी | जबाबदार अधिकरी |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती. शारदा काळे, यवतमाळ, श्रीमती. किर्ती लोखंडे, अमरावती व श्रीमती. मुस्कान समुदे, गोंदिया या महिलांचा मृत्यू कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करतेवेळी लहान किंवा मोठया आतडयाला जखम झाल्यामुळे त्यातून निर्माण होणा-या गुंतागुंतीमुळे झाल्याचे निष्पन्न होत आहेत. यासाठी भविष्यामध्ये उत्कृष्ट शस्त्रक्रियेनंतरच्या पाठपुरावा करण्यासाठी तज्ञांच्या अभिप्रायाप्रमाणे मार्गदर्शक सूचना तयार करुन राज्यातील सर्व कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शल्यचिकित्सकांना निर्गमित करव्यात. | मार्गदर्शक सूचना SOP for follow up after Sterilization Operation तज्ञांच्या सहाय्याने तयार करुन राज्यातील सर्व संस्थांना निर्गमित करव्यात. | डॉ. एन.डी. देशमुख, सहाय्यक संचालक (कु.क.) (मा. डावर मॅडम व मा. विनया आंबोरे यांच्या सहाय्याने ) |
| २ | सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये ८० टक्के नुकसान भरपाई लाभार्थ्यांना अदा करण्यात आली आहे. तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये प्रलंबित लाभार्थ्यांना तातडीने लाभ देण्याविषयी पाठपुरावा करण्यात यावा. | प्रलंबित लाभार्थ्यांना तातडीने लाभ देण्याविषयी स्मरणपत्र तसचे अर्धशासकीय पत्राद्वारे सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांना निर्गमित करुन पाठपुरावा करण्यात यावा. | डॉ. एन.डी. देशमुख, सहाय्यक संचालक (कु.क.) |
| ३ | मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांन्वये सर्व जिल्हयातील ५ टक्के स्टॅटिक मोड मधील सत्रांचे २ टक्के फिक्स डे सेशन सत्रांचे व १ टक्का मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयातील सत्रांचे नियमित तपासणी करुन आढळलेल्या त्रुटींचे जिल्हास्तरावरुन निराकरण करावे. | याबाबत सर्व जिल्हास्तरावर आढळून आलेल्या निरिक्षणामधील त्रुटींचे निराकरण करणेबाबत परिपत्रक निर्गमित करावे. | डॉ. एन.डी. देशमुख, सहाय्यक संचालक (कु.क.) |

सदस्य-सचिव तथा
अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा
कुटुंब कल्याण, मा.बा.सं. व शा.आ. पुणे

अध्यक्ष तथा
आयुक्त (आरोग्य सेवा) तथा
अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य
अभियान, मुंबई



Scanned by CamScanner